# भुरी, डाऊनी मिल्ड्यू रोगाच्या नियंत्रणाकडे लक्ष द्यावे

**द्राक्ष सल्ला**

डॉ. सुजोय सहा, डॉ. रत्ना ठोसर

बदलत्या हवामानामुळे द्राक्ष बागायतदारांसमोर नवे संकट उभे राहिले आहे. वातावरणात अचानक होणाऱ्या बदलांचा द्राक्ष मण्यांवर परिणाम होताना दिसत आहे. वाढलेली थंडी आणि सकाळी पडणाऱ्या दवामुळे द्राक्ष बागेतील भुरी व केवडा रोगांना अनुकूल वातावरण तयार झाले आहे. अशा परिस्थितीत बागेची काळजी घेणे गरजेचे आहे.


- काही भागांमध्ये द्राक्ष बागा फळधारणेच्या अवस्थेत असून, अशा वेळी भुरीचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. या बागांमध्ये भुरीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी सल्फर २ मि.लि प्रति लिटर किंवा ॲंपिलोमायसेस क्विसक्वालिस ६ ते ८ मि.लि. प्रति लिटर या प्रमाणे फवारणी करावी.
- काही द्राक्षबागांमध्ये अजून फळधारणा झाली नसेल, तर अशा ठिकाणी भुरी प्रादुर्भावासाठी पुढील प्रमाणे बुरशीनाशकांची फवारणी करावी.
  फ्लुओपायरम (२००) अधिक टेब्युकोनॅझोल (२०० एससी) ०.५६३ मि.लि. प्रति लिटर किंवा
  सायफ्लुफेनामीड (५ टक्के ईडब्ल्यू) ०.५ मि.लि. प्रति लिटर किंवा
- फ्लुक्सापायरॉक्साईड ७५ ग्रॅम प्रति लिटर अधिक डायफेनकोनॅझोल ५० ग्रॅम प्रति लिटर एस सी (रेडी मिक्स) ०.८ मि.लि. प्रति लिटर पाणी (८०० मि.लि. प्रति हेक्टर) या दराने फवारणी करावी.
- ॲंपिलोमायसेस क्विसक्वालिस हे भुरी विरुद्ध जैविक बुरशीनाशक म्हणून काम करते. त्याचा वापर नियमितपणे चालू ठेवावा.
- फळधारणेनंतर आधिक प्रमाणात भुरी रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास, मेट्राफेनोन (५० टक्के एससी) ०.२५ मि.लि. प्रति लिटर (२५० मि.लि. प्रति हेक्टर) या प्रमाणे फवारणी करावी. फवारणीपूर्वी राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे यांच्या संकेतस्थळावरील परिशिष्ट ५ (Annexure ५) नुसार काढणीपूर्व कालावधी अंतर पडताळून पाहणे अतिशय आवश्यक आहे.



द्राक्ष पानावर दिसणारी डाऊनी मिल्ड्यूची लक्षणे.

- ज्या भागांमध्ये दवाचे प्रमाण अधिक आहे, अशा भागांमध्ये डाऊनी मिल्ड्यू किंवा केवड्याचा प्रादुर्भाव वाढू शकतो. तो टाळण्यासाठी मॅंकोझेब (७५ टक्के डब्लूपी) ३ ते ५ किलो प्रति एकर या दराने धुरळणी करावी.
- द्राक्षपिकाच्या फळधारणेनंतरच्या अवस्थेमध्ये निर्यातक्षम द्राक्ष बागांमध्ये सायमोक्सॅनिल अधिक मॅन्कोझेब, डायमेथोमॉर्फ, इप्रोव्हॅलीकार्ब अधिक प्रोपिनेब, मॅंडीप्रोपामिड या बुरशीनाशकांचा वापर करू नये.
- याचबरोबर ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची ठिबकमधून नियमितपणे आळवणी सुरू ठेवावी.
- छाटणीनंतर ९० दिवस पूर्ण झालेल्या बागांमध्ये बॅसिलस सबटिलिसची २ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करणे फायद्याचे राहील.
- बऱ्याच वेळा रोगाची लक्षणे आणि वनस्पती वाढ नियंत्रकांचे अधिक्य, तीव्र सूर्यप्रकाशामुळे निर्माण होणारी लक्षणे यामध्ये सारखेपणा दिसून येतो. त्यांची व्यवस्थित ओळख पटवण्यासाठी व योग्य उपाययोजनेसाठी संबंधित तज्ज्ञाचा वेळेवर सल्ला घेऊनच उपाययोजना कराव्यात.

(**टीप** : द्राक्ष बागेमध्ये पूर्ण कॅनोपी असताना एक हेक्टर क्षेत्रासाठी एक हजार लिटर पाणी बुरशीनाशकांचे द्रावण बनवण्यासाठी वापरावे.)



द्राक्ष बागेत भुरीचा प्रादुर्भाव थंडीच्या काळात वाढत आहे.

☎ : ०२० -२६९५६०३२ (राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, मांजरी, जि. पुणे)

Scanned by CamScanner